प्रेस नोट                    दि.१५/०३/२०१९

## भारती विदयापीठ पोलीस ठाणे पुणे शहर

## हातचलाखी करून सोन्याचे दागिने चोरणारी महीला अटक केल्याबाबतची उल्लेखनीय कामगिरी

दि.०९/०३/२०१९ रोजी भारती विद्यापिठ पोलीस ठाणे हददीत गंभीर गुन्हयांना प्रतिबंध व्हावा म्हणुन तपास पथकाचे अधिकारी पोउनि महेंद्र पाटील स्टाफसह पेट्रोलींग करत असताना सपोफौ प्रदीप गुरव यांना बातमीदारामार्फत माहीती मिळाली की, भारती विदयापीठ पोलीस ठाणे गु.र.नं २००/२०१९ भा.द.वि.कलम ३७९,३४ मधील अनोळखी दोन महीला आरोपी पैकी चेष्मा घातलेली, रंगाने गोरी, अंगाने सडपातळ, वय अंदाजे ३८ वर्ष असलेली महीला हि कात्रज ते दत्तनगर रोडवरील रिक्षा बसस्टॉप जवळ थांबलेली असुन तिने अंगात रंगीबीरंगी रंगाचा टॉप व हिरवे रंगाचा लेगीन घातलेली आहे. अशी खात्रीशीर माहीती मिळाली असता सदर माहीतीप्रमाणे नमुद ठिकाणी साधे वेशात जावुन सापळा लावुन तिला ताब्यात घेवुन नाव पत्ता विचारता कोमल विनोद राठोड वय-३९ वर्ष रा. पाण्याचे टाकीजवळ सच्चाईमाता मंदीरासमोर, कात्रज, पुणे असे असल्याचे सांगितले तिला भारती विदयापीठ पोलीस ठाणे गु.र.नं २००/२०१९ भादवि कलम ३७९,३४ बाबत सखोल तपास करता तिने व तिची मैत्रीण कल्पना राठोड हिचेसह दाखल गुन्हा केल्याची कबुली दिल्याने तिला सदर गुन्हयात अटक करुन तिचेकडे सखोल तपास करता तिने व तिचे मैत्रीणीने अजुन गुन्हे केल्याची कबुली दिल्याने तिचेकडुन नमुद गुन्हयातील तसेच इतर ०२ गुन्हयातील चोरीस गेलेला मुददेमाल हस्तगत केलेला आहे. नमुद महीला आरोपी हिचेकडुन एकुण कि .रू. २,१०,०००/- चे ६९ ग्रॅम वजनाचे सोन्या दागिने जप्त करून भारती विद्यापिठ पो.ठाणे कडील तीन चोरीचे गुन्हे उघडकीस आलेले आहेत. अधिक तपास तपास पथकाचे अधिकारी पोउनि महेंद्र पाटील हे करीत आहेत.

सदर महीलेवर रत्नागिरी येथे गुन्हे दाखल असून सदर महीला तिचे महीला साथीदारासह सोन्याची दुकाने तसेच बसमध्ये देखील प्रवासादरम्यान देखील चोरी केलेल्या आहेत.

सदरची कारवाई मा. श्री रविंद्र सेनगावकर, अपर पोलीस आयुक्त, पश्चिम विभाग, मा. श्री बच्चन सिंह, पोलीस उप-आयुक्त, परि-२ पुणे शहर, मा. व्ही. पी. नांदेडकर, सहा. पोलीस आयुक्त, स्वारगेट विभाग पुणे, विष्णू पवार, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, विष्णू ताम्हाणे पोलीस निरीक्षक (गुन्हे), भारती विदयापीठ पोलीस ठाणे, सहा. पो. निरीक्षक नलावडे यांचे मार्गदर्शनाखाली तपास पथकाचे अधिकारी पोउनि महेंद्र पाटील , सपोफौ प्रदीप गुरव, पोहवा विनोद भंडलकर, गणेश सुतार, उज्वल मोकाशी, प्रणव सकपाळ, शिवदत्त गायकवाड, जगदीश खेडकर, महीला पोलीस कर्मचारी यशोदा वेदपाठक, सुवर्णा वाघमोडे यांचे पथकाने केलेली आहे.